Page :
Date : / /

॥श्री॥

# "तालीम"

लेखक- शरदचंद्र गोविंद लिमये

"तालीम" म्हटले की कुस्त्यांचा आखाडा डोळ्यासमोर येतो. तालीमखान्यात हौद्यातली लाल माती, ते जोर बैठका काढत घुमणारे पैलवान, कुस्त्यांचे डावपेच शिकवणारे वस्ताद हे सर्व दृश्य सर्व तालीमखान्यात दिसतेच. कोल्हापूर शहर तर कुस्तीगीरांचं गांव मानलं जातं. तिथे प्रत्येक पेठेत तालीम आहे. शिवाय जगप्रसिद्ध कुस्त्यांचं "खासबाग" मैदानही आहे. जशी कोल्हापूर-करवीरनगरी- कुस्तीनगरी म्हणून प्रसिद्ध आहे तशी "कलानगरी" या नांवाने ओळखली जाते. तालीम हा शब्द कुस्ती आणि कला या दोन्ही क्रीडा प्रकारांना लागू होतो. या शहरात कुस्त्यांबरोबर चित्रपट आणि नाटकांचेही आखाडे आहेत. खासबाग कुस्ती मैदानाला लागून प्रसिद्ध केशवराव भोसले या नावाचे नाट्यगृह आहे. शहरात जशा अनेक तालमी तशा नाट्यसंस्था आणि चित्रपट निर्मिती संस्थाही आहेत. आखाड्यात कुस्त्यांच्या तालमी तशा अनेक संस्थांच्या नाटकाच्या तालमी ही चालू असतात. तर आपण तालीम याबद्दल थोडसं बोलू ... अहं कुस्तीच्या नाही हं - नाटकाच्या तालमीबद्दल बोलू.

तालीम याचा अर्थ सराव - प्रॅक्टीस. सरावाशिवाय कोणत्याही क्रीडा प्रकारात वा कला प्रकारांत प्राविण्य मिळवता येत नाही. सरावासाठी रोज कांही वेळ द्यावयाचा लागतो. नाटकाच्या तालमीसाठीही रोज वेळ देणे गरजेचे असते. हौशीनाट्यसंस्था तीन-चार महिने तालीम करतात. व्यावसायीकवर काम करणारे कलाकार एवढा वेळ देऊ शकत नाहीत. त्यांचे तालीमीचं वेळापत्रक सर्व कलाकारांच्या उपलब्धतेनुसार ठरवले जाते. हौशी कलाकार आपल्या नोकऱ्या, व्यवसाय ।शिक्षण सांभाळून तालमी देत असतात.

कुस्तीच्या तालमीत एक वस्ताद प्रशिक्षक असतो तसं नाटकाच्या तालमीसाठी एक दिग्दर्शक-डायरेक्टर असतोच. पूर्वीच्या काळी नाटक मंडळी मध्ये तालीम मास्तर असायचे. दिग्दर्शकाने तालमीचे नियंत्रण करावयाचे.

वर उल्लेख केल्याप्रमाणे शालेय जीवनात मी शाळेच्या तालीमखान्यातील मातीच्या हौद्यात उतरून लाल माती अंगाला लावून व्यायाम करीत असे. मात्र कुस्ती कधीही केली नाही. हातापायांना लाल माती लागली की पैलवान झाल्याचा उगीचच फील यायचा. पैलवान नाही झालो पण रंगमंचावर तोंडाला रंग लावून कलाकार झालो.

"पान २ वर"

व्यावसायीक नाटकांचे एक बरे असते. प्रतिथयश लेखकाचं नाटक रंगभूमीवर आणण्यासाठी नामवंत कलाकारांची जोडणी करावी लागते. यासाठी एखादा निर्माता पुढाकार घेतो. मग संगीत, प्रकाशयोजना, नेपथ्य ह्या सर्व पूरक गोष्टी या नाटकाच्या आकर्षणासाठी तितक्याच खर्चिक ताकदीने उभ्या कराव्या लागतात. नामवंत कलाकारांच्या संचात हे नाटक हिट ठरते सर्वार्थाने. हौशी कलावंतांचे तसे नाही. हौशी नाट्यसंस्थांच्या नाट्यनिर्मितीवर मर्यादा असतात.

हौशी नाट्यसंस्थांचे नाटक बसवायचे ठरते ते प्रत्यक्ष नाट्यप्रयोग सादर करण्यापर्यंतच्या प्रवासात अनेक अडचणी निर्माण होत असतात. सर्वप्रथम तालमीचीजागा, नाटकाची निवड, स्त्री कलाकारांचा शोध या प्राथमिक बाबी पूर्ण करण्यातच नाट्यसंस्थांची दमछाक होत असते. आतां थोडं स्त्री कलाकारा विषयी - - - - एक काळ असा होता - - नाटकांत काम करण्यासाठी बाहेरगांवाहून स्त्री कलाकार मानधन तत्वावर आणाव्या लागत. त्या स्त्री कलाकार व्यावसायीक असल्याने त्यांना एक महिना आधी बिदागी ठरवून तारखा मिळत असत. या स्त्री कलाकार नाट्यप्रयोगाच्या आधी एक दिवस येत आणि नाटकाच्या तालमी देत. आतां ती परिस्थिती राहिली नाही हल्ली गावोगावी मालिका / चित्रपटांची चित्रीकरण चालू असते. त्यामध्ये स्थानिक कलाकारांचा सहभाग असतो. अनेक तरुणी, महिला, तरुण या मालिका / चित्रपटांत काम करू लागले त. त्यामुळे स्त्री कलाकार उदंड झाले. कुठेही नाटक बसते आहे असे कळताच त्या तिकडे धाव घेतात.

तालमीची जागा निश्चीत होताच नाट्य वाचनाला प्रारंभ केला जातो. तालमीसाठी मध्यवर्ती ठिकाणी असलेल्या शाळा, महाविद्यालये सर्वांना सोयीची होतील अशा जागा नक्की केल्या जातात. नाटकाच्या तालमी रात्री ९ पासून सुरु होतात. नाट्यवाचनानंतर कलाकार निवड, लेखकाची परवानगी, संहितेच्या प्रती, प्रयोगाची तारीख या सर्व प्रक्रिया क्रमाक्रमाने निश्चीत केल्या जातात. या नाटकाची मुख्य प्रक्रिया म्हणजे तालमी.

वास्तविक ठरलेल्या नाटकाच्या तालमीना काम करणाऱ्या कलाकारांनी वेळेवर उपस्थित राहण्याची गरज असते. रोज पूर्ण नाटकाची तालीम होत नाही. रोज एकेक अंकाची तालीम करण्याची शिकस्त दिग्दर्शक करत असतो. एखादा कलाकार गैरहजर राहिला तर तालमीत खंड पडतो. अशा तालमीत कलाकारांच्या हालचाली, हावभाव, या गोष्टी कलाकाराकडून करून घेताना दमछाक होत असते. कुस्ती प्रशिक्षणात वस्ताद गुरुना पहिलवानाला डावपेच शिकवतांना प्रत्यक्ष स्वतः करून दाखवावे लागतात. तद्वतच दिग्दर्शकाला अपेक्षित हालचाली - हावभाव करून दाखवावे लागतात. कलाकारांच्या संवाद पाठांतरावरही लक्ष असावे लागते. पाठांतर जितके लवकर होईल तितके तालमी व्यवस्थित होण्यास मदत होते. अशा प्रकारे २/३ अंकाच्या तालमी पूर्ण करण्यास किमान २ महिने लागतात.

- पाने उलट

Page:
Date: / /

80
तालीम

एक महिनाभर तालीम व्यवस्थित होऊन नाटक बसत असल्याची खात्री दिग्दर्शकाला झाल्याशिवाय प्रयोगाची तारीख ठरवता येत नाही. एकदा तारीख ठरली की मग मात्र नाटकाच्या तालमी अधिक वेगाने करण्याची जबाबदारी दिग्दर्शकाबरोबरच कलाकारांवरही येऊन पडते. मग तालमीत खंड पडून चालत नाही. या तालमीबरोबरच, पार्श्वसंगीत, नेपथ्य, प्रकाशयोजना या जबाबदाऱ्या निश्चित कराव्या लागतात. नाटक बसलेय अशी खात्री झाली की दिग्दर्शकाला हायसे वाटते. पण तालमी वेळेवर आणि सक्तीने झाल्याशिवाय यश टप्प्यात येत नाही. प्रयोग पार पडेपर्यंत संस्थेच्या सर्व घटकांना जीवात जीव नसतो. साधारण जनतेसाठी खुला नाट्यप्रयोग असला तर विशेष टेन्शन नसते. पण राज्य नाट्य स्पर्धेसाठी प्रयोग असेल तर सर्वांच्या मनावर खूपच ताण असतो. अर्थात हे सर्व हौशी कलाकारांच्या बाबतीतच घडते.

कुस्ती जिंकल्यानंतर त्या विजयी मल्लाला जो आनंद होतो - तो मल्ल त्याला मिळालेले पारितोषिक डोक्यावर घेऊन नाचतो. त्याचप्रमाणे हौशी कलाकाराला त्याच्या नाटकात त्याला अभिनयाचे पारितोषिक मिळाले तर आनंद होतोच. दिग्दर्शकाच्या चेहऱ्यावर तर नाटकाच्या तालमी यशस्वी झाल्याचा आनंद ओसंडून वाहतो.

—o—



लेखक- शरदचंद्र गोविंद लिमये
शांतिवन
१७२ मंगळवार पेठ
सातारा ४१५ ००२
९४२२६०५४८२